पशुधन हिताय बहुजन सुखाय

**पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद नांदेड** **जिल्हा व सत्र न्यायालया समोर नांदेड**
Phone 02462 234010 Email ID-dahonanded@gmail.com

---

**जा.क्र.जिपनां/पशुसंवि/आस्था-2/512 /2025 कार्यालय पशुसंवर्धन विभाग ,जिल्हा परिषद नांदेड दि.** 21.04.2025

**<u>सर्वधारण बदल्या सन - 2025</u>**

**प्रति,**

**पशुधन विकास अधिकारी (वि) सर्व**
**पंचायत समिती,सर्व जि. नांदेड.**
**पसशुधन विकास अधिकारी**
**पशुवैद्यकिय दवाखाना श्रेणी -1 सर्व जि. नांदेड**

**विषयः-** सर्वसाधारण बदली प्रक्रिया सन 2025 सहा पशुधन विकास अधिकारी , पशुधन पर्यवेक्षक, व्रणोपचारक संवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांच्या प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत**.**

**संदर्भः- 1.** शासन निर्णय क्र जिपब 414/प्रक्र112 /आस्था- 14 दिनांक 15.05.2014
2. शासन शुध्दीप्रत्रक क्र जिपब/4816/प्र.क्र 16 आस्था-14/ दिनांक 02.01.2017
3. शासन पुरकपत्र क्र जिपब/4817/प्र.क्र 228/आस्था-14 दिनांक 04.03.2019
4. या कार्यालयाचे पत्र क्र जाक्र /जिपनां/पशुसवि/आस्था -2/ 419/03.04.2025

उपरोक्त विषयान्वये ग्रामविकास विभागाकडील संदर्भाधीन शासन निर्णय , शुध्दीपत्रक, पुरकपत्रान्वये जिल्हा परिषदेच्या गट (क) व गट (ड) कर्मचा-यांच्या संर्वसाधारण बदल्यांबाबत सुधारित धोरण निश्चितकरण्यात येवून बदल्याची कार्यवाही पूर्ण करण्या बाबत निर्देश आहेत.

त्याअनुषंगाने संदर्भीय कार्यालयीन पत्रान्वये तालुक्यांतर्गत कार्यरत असलेल्या पशुसंवर्धन विभागाच्या अधिनस्त गट क (वर्ग-३) व गट ड (वर्ग-४ ) संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या दिर्घ वास्तव्यानुसार प्रशासकीय व विनंती बदल्यांची माहिती सादर करण्याबाबत पशुधन विकास अधिकारी विस्तार यांना सूचित करण्यात आले आहे.

संदर्भीय शासन निर्णय, शासन शुद्धीपत्रक व शासन पुरकपत्रातील तरतुदीनुसार प्राप्त माहितीच्या आधारे सर्वसाधारण बदली प्रक्रिया सन २०२५ करीता सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व व्रणोपचारक या संवर्गातील बदलीपात्र अधिकारी / कर्मचारी यांची दिनांक ३१/०५/२०२५ रोजीची सेवा गृहित धरुन तयार करण्यात आलेल्या प्राथमिक वास्तव्य ज्येष्ठता याद्या या सोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदरील प्राथमिक वास्तव्य ज्येष्ठता याद्या संबधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

सदर वास्तव्य ज्येष्ठता यादी बाबत काही हरकती/सुचना/ आक्षेप व तक्रारी असल्यास पुराव्या कागदपत्रासह दिनांक २८/०४/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत. विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेप /हरकतींचा विचार केला जाणार नाही. याबाबत कोणतीही तक्रार उदभवल्यास त्यास सर्वस्वी आपले कार्यालय जबाबदार राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तसेच सर्व सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व व्रणोपचारक यांची नावे जेष्ठता सुचीत आलेली आहेत किंवा कसे याची खात्री करावी. ज्या अधिकारी / कर्मचारी यांना प्रशासकीय बदलीतून सुट किंवा प्राधान्य घ्यावयाचे आहे, त्यांचे विहित नमुन्यातील अर्ज, सुट / प्राधान्य संदर्भातील आवश्यक ती पुराव्याची कागदपत्रे / प्रमाणपत्रासह दिनांक २८/०४/२०२५ पूर्वी कार्यालय प्रमुखांच्या शिफारशीने या कार्यालयास सादर करण्याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**सोबतः- यादी**

**स्वाक्षरीत**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नांदेड,**